

सिंहगड खोऱ्यातील पाणीटंचाईची तीव्रता वाढली असल्याने दूर अंतरावरून खामगाव मावळ येथे बैलांच्या औतावरून पाणी घेऊन जाणारी मुले. (छाया : दत्तात्रय नलावडे)

# सिंहगड खोऱ्यात तीव्र पाणीटंचाई

खडकवासला (प्रतिनिधी) : सिंहगड खोऱ्यातील खामगाव-मावळ मोरवाडी, घेरा-सिंहगड, दुरूपदरा, सांबरेवाडी, परिसरात वाढत्या उन्हाबरोबर पाणीटंचाईची तीव्रता वाढली आहे.

ऐन लग्नसराई, यात्रा उत्सवांच्या दिवसात भीषण पाणीटंचाई जाणवू लागल्याने गावकरी हैराण झाले आहेत. पाणी टंचाईमुळे लग्न सोहळे आता खानापूर, सिंहगड रोड परिसरातील मंगल कार्यालयात होऊ लागले आहेत.

## लग्नसराई, यात्रांना भीषण पाणी टंचाईचा फटका

लोकसभा निवडणुकांसाठी प्रशासन धावपळ करीत असल्याने सिंहगड खोऱ्यातील पाणी टंचाईकडे लक्ष देण्यास अधिकाऱ्यांना वेळ मिळत नाही. मोगरवाडी येथे गेल्या दीड महिन्यापासून रेशनिंग पद्धतीने पाणी वाटप केले जात आहे. खामगाव मावळ, सांबरेवाडी चांदेवाडी येथील महिला-मुलांना उन्हाळ्यात पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.